लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ३.००
सातारा, शनिवार, दि. ९ जानेवारी २०१६

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्रशांत सातपुते, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, हणमंतराव बर्गे व पत्रकार.

# बातमीत सत्यता महत्त्वाची

## प्रशांत सातपुते : कोरेगावमध्ये पत्रकार दिन

**कोरेगाव :** 'जग झपाट्याने बदलत असून, त्यामुळे वाचकवर्गही जागरूक झाला आहे. तेव्हा बातमीत सत्यता महत्त्वाची आहे. शब्दकोष समृद्ध असेल तर पत्रकारांना माणसं अनुभवतात, वाचता व जाणता येतात. शासनाच्या केंद्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर असणाऱ्या उच्च पदावरील जागा बऱ्याच अंशी रिक्त आहेत. विद्यार्थ्यांनी पत्रकारिता या क्षेत्रात स्वतः झोकून दिल्यास यश निश्चित मिळत असते,' असे प्रतिपादन जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये मराठी विभाग व जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या पत्रकार दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत होते.

प्राचार्य डॉ. सावंत म्हणाले, 'वृत्तपत्र हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून, पत्रकार हे समाजाच्या विविध प्रश्नांकडे डोळसपणे पाहून त्या बातमीच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न करतात.'.

यावेळी प्रमुख पाहुण्यांसह कोरेगाव तालुका मराठी पत्रकार संघाच्या सदस्यांचा कॉलेजतर्फे सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. बाळासाहेब चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. विद्या नावडकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. बी. पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते. (प्रतिनिधी)